**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

Govt. G.R

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र.टिईएम-२००८/(२३२/०८)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - २६ जून, २००८.

संदर्भः- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे
क्र. ०८/०१/MHA/MBA/२००८/६३, दिनांक ३० मे, २००८ चे पत्र.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करिता खाली नमूद संस्थेला नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | स्वर्गीय संजीभाई रुपजीभाई मेमोरिअल ट्रस्टचे दि एसएसआर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, सायली, सिल्व्हासा-३९५६२३०. | एमबीए पदव्युत्तर पदवी | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००८-२००९ नविन एम.बी. ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधीत अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/ पद्धतीनुसार पुढीलप्रमाणे करील.

| | | |
|---|---|---|
| १. | संस्था स्तरावर भरण्यात येणा-या जागा | २० टक्के |
| २. | दादरा नगर हवेली येथील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित जागा | २० टक्के |
| ३. | महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित जागा | ३० टक्के |
| ४. | देशातील विद्यार्थ्यांसाठी जागा | ३० टक्के |

४) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संस्थेने प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार पुणे विद्यापीठाशी संलग्नीकरण करुन घ्यावे.

५) राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्याकरिता शिक्षण शुल्क समितीची स्थापना केली आहे. तथापि, सदर संस्था दादरा नगर हवेली या ठिकाणी असून तेथे अशा प्रकारे शिक्षण शुल्क समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क तेथील शिक्षण विभागाने निश्चित केल्यानुसार राहील. तसेच, सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाजिक आरक्षण हे केंद्रशासित प्रदेशातील धोरणानुसार राहील.

(कृपया मागे पहा.)

६) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

७) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

८) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

९) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
संबंधित संस्था
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE1\GR\Marathwada Mitra.doc